<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१</u> <u>सं.फौ.ख.क्र.७०३/२०२५</u>

सरकार विरूध्द राजेश

मी शपथपूर्वक खरे सांगतो की निशाणी – ७

माझे नाव – प्रदिप गंगाधर भोकरे
वय – अंदाजे ५२ वर्ष, व्यवसाय – कनिष्ठ लिपीक, नगर परिषद, कामठी.
राहणार – कामठी.

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. लुले यांच्या कडून**

मी नगर परिषद कामठी येथे गेल्या १५ वर्षापासून कार्यरत आहे. घटना दि०१२.११.२०२४ रोजी घडली होती. त्यावेळी लोकसभेच्या निवडणूका होत्या. आचारसंहिता नियंत्रक कक्षात सहाय्यक म्हणून मला नेमण्यात आले होते. मी हजेरी पुस्तक पाहिले असता दि.०९.११.२०२४ ते १२.११.२०२४ पर्यंत आरोपी गैरहजर दिसून आले.

२. आरोपी मंडळ अधिकारी म्हणून तहसिल कार्यालय कामठी येथे कार्यरत होते. त्यांची भरारी पथकात ईन्चार्ज म्हणून निवडणूक कार्यक्रमासाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यामुळे मी त्यांना १२ तारखेला फोन केला असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिले. ते मला, "च्या मायला तुम्ही आमचे साहेब झाले का, आता तुम्ही आम्हाला आदेश देणार का" अश्या अभद्र भाषेत बोलले. तसेच "तुम्हालाही पाहतो व एस.डी.ओ. ला ही पाहतो" असे बोलले. याची सुचना मी माझ्या वरिष्ठांना दिली. त्यांनी आरोपीला कारणे दाखवा नोटीस पाठविले. त्या नोटीसीला आरोपीने उत्तर पाठविले नाही. त्यानूसार लोक प्रतिनीधी कायदयानूसार गुन्हा दाखल करण्याचे आदेश मला प्राप्त झाले. त्या अनुषंगाने मी दि.१२.११.२०२४ रोजी गुन्हा दाखल केला. साक्षीदार पुन्हा सांगतो की गुन्हा १४.११.२०२४ रोजी दाखल केला. मला आता तो रिपोर्ट दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. फिर्यादीस **<u>निशाणी ८</u>** देण्यात येते.

३. मी आरोपीला ओळखतो, ते आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पुडके यांच्या मार्फत सुरू**

४. हे म्हणणे खरे आहे की मी निवडणूक अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी किंवा नोडल अधिकारी म्हणून कार्य करत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की म्हणून मला कोणत्याही अधिका–याची हजेरी तपासण्याचा अधिकार नव्हता. मला हजेरी पुस्तक तपासण्याचा आदेश होता हे दाखविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा मी पोलिसांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी ईन्चार्ज असलेल्या भरारी पथकाचा मी सदस्य नव्हतो. भरारी पथकात कोण होते याबाबत वॅाटसअप वर फोटो काढण्याचा नियम नव्हता. साक्षीदार सांगतो की तसा वरिष्ठांचा आदेश होता. तसा आदेश मी तपासी अधिका–याला दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की तसा आदेश नव्हता. हे म्हणणे खरे नाही की हजेरी पुस्तक तपासण्याचा मला अधिकार नसल्याने तसे पत्र मी पोलिसांना दिले नाही. आमचे कार्यालय ते पोलिस ठाणे यामध्ये दिड किलोमीटर चे अंतर आहे. गाडीवरून पोलिस ठाण्यात जाण्यासाठी १० मिनीटांचा वेळ लागतो.

५. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला "च्या मायला तुम्ही आमचे साहेब झाले का, आता तुम्ही आम्हाला आदेश देणार का" तसेच "तुम्हालाही पाहतो व एस.डी.ओ. ला ही पाहतो" असे कधीही फोनवर किंवा प्रत्यक्ष बोलले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी फिर्याद वरिष्ठांचया आदेशानूसार दाखल केली.

६. हे म्हणणे खरे आहे की आरोपी मंडळ अधिकारी आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी हे पटवारी संघटन व मंडळ अधिकारी संघटन चे प्रमुख आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी ब–याच वेळेला पटवारी व मंडळ अधिकारी संघटन यांचे प्रश्न प्रांतांकडे मांडतात. त्यामुळे आरोपी व तत्कालीप प्रांत यांच्यामध्ये वाद होता का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की त्याच वादामुळे वरिष्ठांनी मला फिर्याद दाखल करायला आदेश दिला. हे म्हणणे खरे नाही की आरोपींच्या ९ ते १२ तारखेच्या हजेरी बुकावर सहया नव्हत्या हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की वरिष्ठांच्या आदेशानूसार खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.08 17:02:30 +0530

कामठी
दिनांक ०८/०४/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी